Volume: 4 Issue: 7 Pages: 12-16




# चार्वाक दर्शनातील नाविन्यता आणि सद्यःस्थिती

*[1] डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे

*[1] प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी, ता. खटाव जि. सातारा, महाराष्ट्र, भारत

**Article Info.**
**E-ISSN: 2583-6528**
**Impact Factor (SJIF): 6.876**
**Peer Reviewed Journal**
**Available online:**
**www.alladvancejournal.com**

**Received:** 16/ June/2025
**Accepted:** 05/July/2025

***Corresponding Author**
**डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे**
प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी, ता. खटाव जि. सातारा, महाराष्ट्र, भारत

**सारांश:**
चार्वाक दर्शनात विविध प्रकारच्या नाविन्यता दिसून येतात त्यामध्ये प्रामुख्याने चार्वाक दर्शनात माणसाच्या भौतिक जीवनात प्राधान्य दिले ज्यामुळे सद्यः स्थितीत मानवी विकासाची अनेक दालने समृद्ध होण्यास मदत होण्यासाठी आणि भौतिक जीवनाचा खरा आनंद घेण्याची सक्षम क्षमता असलेल्या मानवाला त्याच्या क्षमताची जाणीव करून देण्याचे कार्य चार्वाकतत्त्वविचारांनी केलेले आहे. चार्वाक तत्त्वविचाराने मानवतावादी व्यवस्थेचे समर्थनच केले नाही तर तशा प्रकारची समाज व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न या विचारधारेने केला आहे. चार्वाकांची भविष्यकाळ मृत्यूच्या पलीकडे ताणावा अशी त्यांची इच्छा नव्हती तर वर्तमान काळातील कृतींच्या भविष्यकालीन परिणामाची त्यांना जाणीव होती म्हणून चार्वाकांनी भावी सुखासाठी विवेक पूर्ण कृती करावी असे म्हटले आहे. चार्वाक दर्शनात सुखवादी संकल्पनेचा दृष्टीकोन असा आहे की, सुखप्राप्तीसाठी परिश्रमाला पर्याय नाही कारण माणसाला सुख हवेच असते. सुखासाठी माणसाची सतत धडपड सुरू असते. सुख किंवा आनंद म्हणजे लैंगिक स्वैराचार नाही त्यासाठी ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे. सुख म्हणजे केवळ 'खा, प्या, मजा करा' इतकेच नसून ते भौतिक तत्त्वज्ञानच आहे. चार्वाक दर्शनात मानवाने केवळ भय, निद्रा आहार, मैथुन यातच गुरफटून न जाता त्याच्याही पुढे गेले पाहिजे कारण मानव प्राणी हा इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आहे त्यामुळे तो शारीरिक सुखाची अपेक्षा करतो आणि ही बाब नैसर्गिक आहे. 'खा, पी चैन कर' ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे याला फाटा देऊन चालणार नाही मात्र ही सहज प्रवृत्ती नैतिकतेच्या कसोटीवर खरी उतरली पाहिजे. चार्वाकांनी यज्ञ संस्कृतीचा विरोध करताना सतत कार्य करणे म्हणजेच यज्ञ याचा पुरस्कार केला आहे अर्थात दैववाद मानवाला पुरुषार्थहीन बनवितो तर प्रयत्नवादात परिश्रामाला पर्याय नसून प्रयत्न करणारा हा कर्मवादी असतो. प्रा. डॉ. आ.ह. साळुंके यांनी संबोधले आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. चार्वाकांनी जीवनाविषयी आस्था निर्माण केली आणि मोक्षास पुरुषार्थ न मानता अर्थ आणि काम तत्त्वास पुरुषार्थ स्वरूपात स्वीकारला. ही नाविन्यता आजच्या समाजास खूपच पोषक आहे.

**मुख्य शब्द:** वेदप्रामाण्य, इहलोक-परलोक, कर्मफल, अनुकूल वेदना-प्रतिकूल वेदना

## प्रस्तावना:

चार्वाक म्हणजे 'चारू वाक्' यात चारू अर्थात गोड, मनाला रुचेल तेच आणि वाक् म्हणजे सांगणारा असा अर्थ सांगता येतोआणि चार्वाक दर्शनाला लोकायत असेही म्हटले जाते, लोकायत म्हणजे इंद्रिये जाणतात तेवढेच जग! चार्वाक हे बंडखोर दर्शन आहे. मी कोण?, मेल्यानंतर शरीरातून काय जाते?, जगाची उत्पत्ती कशी झाली?, अशा गोष्टींचा विचार दर्शने करतातआणि अशी दर्शने अनेक आहेत. वेदप्रामाण्य मानणारी, देवावर व परलोकावर विश्वास ठेवणारी ती आस्तिक दर्शन होय. चार्वाक हे एकमेव दर्शन आहे की जे वेदप्रामाण्य, देवावर व परलोकावर विश्वास या तिन्हींना नाकारतेत्यामुळे ते नास्तिक दर्शन ठरविले गेले आहे. वेद, ईश्वर, आत्मा, कर्मफल, परलोक हे काहीच चार्वाक दर्शन मानत नाहीत. आणखी वेगळेपण म्हणजे चार्वाक दर्शनात केवळ प्रत्यक्ष हेच एकमेव प्रमाण मानतात. चार्वाक असे म्हणतात की, "शहाण्या माणसाने व्यापार-उद्योग करावा, गोपालन करावे, सत् उपायांनी भोग भोगावेत. देहापेक्षा भिन्न असा आत्मा मानून त्याच्या परलोकातील गतीच्या चिंतेत इहलोकी दुःखात राहणे हा शहाणपणा नाही."

चातुर्वण्य हे संस्कृतीचे अधिष्ठान मानायलाही चार्वाकांचा प्रखर विरोध होता. ऐतिहासिकदृष्ट्या येणारी वंशशुद्धी व तिच्यामुळे येणारा अहंकार यावर चार्वाकांनी कठोर टीका केली आहे. वंशशुद्धी ही वस्तुस्थिती नसून आभास आहे, ते आपले वरिष्ठत्व टिकविण्यासाठी केलेला प्रचार आहे असे चार्वाक मानतात. ज्या काळात पुरोहितवादाचे अवडंबर माजले होते, यज्ञातबळी दिले जात होते, ज्या काळात परलोकातील प्रश्नांसाठी इहलोकाकडे पदार्थ म्हणून पहिले जात होते, त्या काळात चार्वाक दर्शनाच्या रूपाने बंडखोर मतप्रवाह म्हणजे निर्भेळ सुखवाद, सत् आचरणाने भोग भोगणे हेच जीवनव्रत.

वैकल्ये, उपास-तापास, नवस, देव, यज्ञयाग, परलोकचिंता, कर्मफल, पाप-पुण्य संकल्पना, पुर्वजन्म-पुनर्जन्म, मोक्ष, श्राद्धविधी यांना मानवी जीवनात स्थानाच नाही. त्यामुळे अमूर्त बाबींनी मन चिंताग्रस्त करण्याची गरज नाही असे चार्वाक दर्शन सांगते.

**चार्वाक दर्शनातील तत्त्वविचारांच्या वैचारिक भूमिकेबद्दल परस्परविरोधी मते असण्याची करणे** –

1. चार्वाक दर्शनातील अपुरी माहिती - कारण चार्वाकाचे ग्रंथ जाळले गेले होते
2. विरोधकांनी लावलेले चार्वाक दर्शनाबद्दलचे विरोधाभासी अर्थ आणि
3. चार्वाक दर्शनाबद्दलची विरोधी वलये

भारताच्या सामाजिक इतिहासातील विज्ञाननिष्ठ, विवेक प्रामाण्य मानणारे एक धगधगते व्यक्तिमत्व, वर्षानुवर्षाच्या अन्यायावर व शोषणावर उत्तरे शोधणारी विचारसरणी म्हणजे चार्वाक तत्त्वविचार होय. भारताच्या दार्शनिक इतिहासात अद्वितीय स्थान असलेल्या तर्कनिष्ठ आणि बुद्धिप्रामाण्यवादी चार्वाक दर्शनाला इतर सर्व दर्शनांनी अगदी जैन व बौद्ध या नास्तिक दर्शनांनीसुद्धा विरोध केला. त्यांच्या युक्तिवादांना पटण्याजोगी उत्तरे देता येईनात म्हणून सर्वानी त्यांच्या तत्त्वविचारांचा चुकीचा अर्थ काढला. चार्वाक मताप्रमाणे जे ज्ञान इंद्रियांद्वारे बुद्धीला होते तेच अस्तित्वात आहे असे समजले जाते. चैतन्य हे जडापासूनच निर्माण होते. चैतन्याला वेगळे अस्तित्व नाही आणि देह नष्ट झाला की तेही नष्ट होते. आकारामुळे निराकाराचा भास होतो, निराकार असे काही नाही, फक्त आकारच आहे. चार्वाक दर्शन हे देव, दैव अध्यात्म इत्यादी संदर्भात नास्तिक दर्शन वाटले तरी ते शेती, व्यापार, उद्योग करून धन कमवून सुखाने जगावे असे सांगते. हे लक्षात घेता चार्वाक दर्शन हे अस्तिकवादी म्हणजे जीवना संदर्भातील सकारात्मक दर्शन ठरते.

## संशोधन पद्धती

संशोधकाने प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात केलेला आहे. ऐतिहासिक पद्धती बरोबरच विश्लेषणात्मक पद्धती आणि अनेक दुय्यम साधनांचाही वापर या संशोधन लेखाच्या अनुषंगाने केलेला आहे. त्याचबरोबर सदरील संशोधन लेखासाठी नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख आणि विविध तज्ञांची मते विचारात घेऊन चार्वाक दर्शनातील नाविन्यता मांडली आहे.

## संशोधनाची उद्धीष्टे

1. प्राचीनकालीन चार्वाक दर्शनातील तत्वविचारांचा सखोल आढावा घेणे
2. चार्वाक दर्शनातील तत्वविचारांच्या नाविन्यतेचे विश्लेषण करणे
3. चार्वाक दर्शनातील नाविन्यता आणि सदद्य: स्थिती अभ्यास करणे

### चार्वाक दर्शनातील नाविन्यतेचे विश्लेषण

चार्वाक दर्शनातील तत्वविचारांचा सखोल आढावा घेऊन चार्वाक दर्शनातील नाविन्यतेचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केले आहे -

1. सामान्यपणे अतीतवादी, आत्मवादी असणाऱ्या भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेत आपल्या जडवादी, अनुभववादी आणि सुखवादी तात्विक भूमिकेमुळे चार्वाक तत्वज्ञानाचे वेगळेपणाने उठून दिसते. चार्वाक ईश्वराचे अस्तित्व नाकारत होते म्हणजे अगदी वैदिकांच्या दृष्टीने देखील काही तर फार मोठा गुन्हा करीत होते. चार्वाक वैदिकांच्या ओंजळीने पाणी प्यायला तयार नव्हते, हा त्यांचा खरा गुन्हा होता. वेदप्रामाण्य नाकारणेही नास्तिकता म्हटली जात होती मात्र हा निकष म्हणजे वरवरचा होता कारण वैदिकांची धारणा अशी होती की, तुम्ही ईश्वर मानता की नाही मानत याला फारसे महत्त्व नसून तुम्ही आमचे ऐकत आहे की नाही? हा खरा दृष्टिकोन होता यालाच वेदप्रामाण्य म्हणत असत.चार्वाकांना नास्तिक म्हणताना वैज्ञानिक दृष्टिकोनातून आणि पूर्णपणे पारिभाषिक संज्ञा या स्वरूपात अर्थ घेतलेला नाही. ईश्वर, वेदप्रामाण्य इत्यादी संकल्पना नाकारतो म्हणजे चार्वाक नास्तिक आहे परंतु नेमक्या तेवढ्याच अर्थाने ते नास्तिक आहेत असे वैदिकाने संबोधले नाही.
2. प्राचीन भारतातील ही इहलोकवाद 'लोकायत' या नावानेच प्रामुख्याने ओळखला जातो.चार्वाकांनी आत्मा,मौक्ष, स्वर्ग-नरक, परलोक, पुर्वजन्म-पुनर्जन्म इत्यादी कल्पना असिद्ध ठरवून हे इहलोकवादाने तार्किक समर्थन केल्याने या विचाराला 'चार्वाक दर्शन' हे नाव प्राप्त झाले. चार्वाक दर्शन हे देव, दैव अध्यात्म इत्यादी संदर्भात नास्तिक दर्शन वाटले तरी ते शेती, व्यापार, उद्योग करून धन कमवून सुखाने जगावे असे सांगते, हे लक्षात घेता चार्वाक दर्शन हे अस्तिकवादी म्हणजे जीवना संदर्भातील सकारात्मक दर्शन ठरते. प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांनी चार्वाकास 'आस्तिकशिरोमणी' संबोधले आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. चार्वाकांनी मोक्षास पुरुषार्थ न मानता अर्थ आणि काम तत्त्वास पुरुषार्थ स्वरूपात स्वीकारला, जीवनाविषयी आस्था व्यक्त केली. कार्ल मार्क्सने अर्थ तत्व जीवनाचे सर्वोपरीश्रेष्ठ तत्त्व ठरविले. परलोकवादी विचारसरणीचा सर्वात कृत प्रतिवाद म्हणजे समाजास अंधश्रद्धेपासून दूर ठेवण्यासाठी सामाजिक कर्तव्य परायणता नाही का? वर्णभेद निजातीभेद विरोध, स्त्री अत्याचाराचा वाचा फोडणे इत्यादीतून चार्वाकांची समशीलता स्पष्ट होते. चार्वाकाचे तत्त्वज्ञान सुसंघटित समाजाचे स्वप्न पाहते, ते सहिष्णू समाज निर्माण करू इच्छिते यातून ते दर्शनआस्तिक आणि आदर्शवादी ठरते.
3. भारताच्या सामाजिक इतिहासातील विज्ञाननिष्ठ, विवेक प्रामाण्य मानणारे एक धगधगते व्यक्तिमत्व, वर्षानुवर्षाच्या अन्यायावर व शोषणावर उत्तरे शोधणारी विचारसरणी म्हणजे चार्वाक होय. इतिहासकालीन अशिक्षीत, पिचलेल्या व गांजलेल्या सर्वसामान्य माणसाच्या श्रध्दाळू मनाचा गैरफायदा तत्कालीन प्रस्थापितांनी घेतला, बहुसंख्य लोकांची पिळवणूक केली, त्यांना जनावरांचे जिने जगावयास लावले. हे करित असताना सर्व हक्क, अधिकार, खरे - खोटे ठरविण्याची न्याय पध्दती या ना त्या मार्गाने आपल्याच हातात ठेवण्याचे कौशल्य तत्कालीन प्रस्थापितांनी दाखविले. त्यांच्या या व्यवस्थेवर आसूड ओढणारे व स्वतंत्रपणे विवेकाने व्यवस्थेचे वाभाडे काढणारे व्यक्तिमत्व म्हणजे चार्वाक! अन्यायी प्रस्थापित व्यवस्थेविरूध्द विवेकी बंडाचा झेंडा उंच धरणारे क्रांतिकारक म्हणजे चार्वाक! तत्कालीन सर्वच धार्मिक ग्रंथांनी मांडलेल्या व मानलेल्या उच्चादी सिध्दांतांची कठोर चिकित्सा करणारे 'उमदे समाजसुधारक' म्हणजे चार्वाक!
4. 'चारू वाक्' म्हणजे आवडेल असे बोलणारा आणि चार्वाक दर्शनालाच लोकायत असेही म्हणतात. लोकायत म्हणजे इंद्रिये जाणतात तेवढेच जग! चार्वाक हे बंडखोर दर्शन आहे. वेद, ईश्वर, आत्मा, कर्मफल, परलोक हे काहीच ते मानत नाहीत. आणखी वेगळेपण म्हणजे ते केवळ प्रत्यक्ष हेच एकमेव प्रमाण मानतात. प्राचीन भारतातील ही इहलोकवाद 'लोकायत' या नावानेच प्रामुख्याने ओळखला जातो.चार्वाकांनी आत्मा, परलोक,पुर्वजन्म-पुनर्जन्म इत्यादी कल्पना असिद्ध ठरवून हे इहलोकवादाने तार्किक समर्थन केल्याने या विचाराला 'चार्वाक दर्शन'हे नाव प्राप्त झाले. चार्वाक दर्शन हे देव, दैव अध्यात्म इत्यादी संदर्भात नास्तिक दर्शन वाटले तरी ते शेती, व्यापार, उद्योग करून धन कमवून सुखाने जगावे असे सांगते. हे लक्षात

घेता चार्वाक दर्शन हे अस्तिकवादी म्हणजे जीवना संदर्भातील सकारात्मक दर्शन ठरते. प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांनी चार्वाकास 'आस्तिकशिरोमणी' संबोधले आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

यावत्जीवेत् सुखं जीवेत्,
ऋणं कृत्वा घृतं पिबेत्
भस्मीभूतस्य देहस्य, पुनरागमनं कुत:?

चार्वाक तत्त्वज्ञानात हा मुख्य श्लोक प्रसिद्ध आहे. परंतु या श्लोकावर आधारित आरोप विरोधकांनी केले ते असे की, चार्वाक दर्शनाचे अनुयायी बेजबाबदार आणि चारित्र्यहिन आहेत. कारण चार्वाक दर्शन उपरोक्त श्लोकाप्रमाणे अधिक व्याजाने ऋण घेऊन चैन - मजा करण्यास सांगते शिवाय घेतलेल्या ऋणाची परतफेडही न करणे हे बेजबाबदारपनाचे आहे अशा आरोपाचे सूर विरोधकांनी लावले. असे असले तरी चार्वाक दर्शनात अधिक व्याजाने ऋण घेऊन चैन करा - मजा करा आणि घेतलेले ऋण फेडू नका असा निर्देश दिलेला नाही.

5. मानवाने जीवनात सुख मिळविणे हा त्याचा अधिकार या जीवनातील सुख हेच खरे सुख आहे आणि ते मिळाले पाहिजे केवळ परलोकातील सुखासाठी इहलोकातील दु:ख भोगा असे चार्वाक दर्शन सांगत नाही हीच तर चार्वाक दर्शनातील नाविन्यता आहे. केवळ पारलोकातील जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्तता हाच मोक्ष असे चार्वाक विरोधकांनी सांगितले तर चार्वाक दर्शनाने पारलौकिक सुख आणि स्वातंत्र्य काल्पनिक असून मानवाला या जन्मात खरे सुख आणि स्वातंत्र्य उपभोगता येते असे चार्वाक दर्शनात मांडले. हे मांडण्याचे कारण म्हणजे चार्वाकांनी उगाच हातचे सोडून पळत्याच्या मागे मागे लागण्यात काय अर्थ आहे असा प्रश्न उपस्थित केले.
वैदिकांनी सांगितलेल्या धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थ्यांपैकी केवळ अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ चार्वाकाने स्वीकारले आहेत, त्याच्यामध्ये पुरुषार्थ म्हणजे प्रयत्न - पराक्रम होय. सुखाचा शोध या जन्मताच घ्यावा असे सांगताना चार्वाक दर्शनात पुनर्जन्माला स्थान नाही. सुखाचा उपभोग घेताना चार्वाकाने स्वैराचाराचे समर्थन केले नाही किंवा अनैतिक मार्गाचा अवलंब करा असेही सांगितलेले नाही. यावरून असे म्हणता येईल की, सुखाचा उपभोग हा संयमाने घ्यावा. त्यामुळे चार्वाक दर्शनावर बेजबाबदारीपणाचा, स्वैराचाराचा आणि अनैतिकतेचा आरोप करता येत नाही.
6. मनुने 'मांस भक्षणे दोषो न मद्य नच मैथुने' अर्थात मांस खाण्यात तसेच मद्य आणि मैथुन यात काही दोष नाही किंवा ते सृष्टीकरणाच्या विपरीत नाही असे सांगितले आहे मात्र चार्वाक दर्शनात मानवाने केवळ आहार, निद्रा, भय, मैथुनातच गुरफटून न जाता त्याच्याही पुढे गेले पाहिजे कारण मानव प्राणी हा इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आहे त्यामुळे तो शारीरिक सुखाचे अपेक्षा करतो आणि ही बाब नैसर्गिक आहे. 'खा, पी, चैन कर' ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे याला फाटा देऊन चालणार नाही मात्र ही सहज प्रवृत्ती नैतिकतेच्या कसोटीवर खरी उतरली पाहिजे.

चार्वाक दर्शनातील सुखवाद हा अधिभौतिक सुखवाद होता, ते 'प्रेय' सुखवाद होता. प्रेय सुखवाद व श्रेय सुखवाद असे सुखवादाचे दोन प्रकार म्हणून प्रेय सुखवाद म्हणजे इंद्रियास प्रिय वाटणारे सुख आणि श्रेय सुखवाद म्हणजे आत्म्याचे कल्याण. मानवाला सहजासहजी सुख प्राप्त करता येत नाही त्यासाठी मानवाने प्रयत्नवादी असणे आवश्यक आहे आणि प्रयत्नवादात सातत्य असणे गरजेचे आहे याचा चार्वाक दर्शनाने पुरस्कार केला आहे. चार्वाकांनी दैववादाचा धिक्कार करून प्रयत्नवादाचे समर्थन केले आहे ते पुढीलप्रमाणे –

अ. चार्वाकांनी यज्ञ संस्कृतीचा विरोध करताना सतत कार्य करणे म्हणजेच यज्ञ याचा पुरस्कार केला आहे अर्थात 'काम हिच पूजा'. दैववाद हा मानवाला पुरुषार्थहीन बनवतो तर प्रयत्नवादात परिश्रमाला पर्याय नसून प्रयत्न करणारा कर्मवादी असतो. माणसाने सतत कार्य/काम करीत राहिले पाहिजे. महाभारतातही कर्माला प्राधान्य देण्यात आलेले आहे. इ. स. चौथ्या शतकाच्या आरंभीच्या काळात ग्रीक तत्त्वज्ञान अरिस्टोपस यांनीही सुखवादाचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. तो म्हणतो "सुखाचा पाठलाग करणे हा मनुष्याच्या नैसर्गिक स्वभाव आहे कारण मनुष्य जगत असतो ते सुखासाठीच, सुखप्राप्तीसाठी त्याची धडपड चाललेली असते मात्र सुख हे योग्य मार्गाने प्राप्त केले पाहिजे."याचा प्राचीन काळात विरोध कोणी केला नव्हता.
आ. ग्रीस देशातील इपीक्युरेसचे म्हणणे होते की, 'सुख हे जीवनाचे उद्दिष्ट आहे. इपीक्युरेसचे नाव'खा, प्या व मजा करा' (Eat, Drink and Be Merry) या वाक्याशी जोडून ग्रीसमध्ये त्याची हेटाळणी केली, त्याच्या सुखवादी तत्त्वज्ञानावर टीका केली परंतु त्याचे विचार मारले नाहीत की त्याला देहांताची शिक्षा देण्याचा विचारही तेथील प्रस्थापितांच्या मनात आला नाही. उलट या प्राचीन भौतिकवादी तत्त्वज्ञानाचा पुढे विकास करण्यात आला मात्र आपल्या येथे 'प्रसंगी कर्ज काढून तूप प्या' म्हणणाऱ्या चार्वाकाचा प्रचंड द्वेष करून त्याचे ग्रंथ नष्ट करण्यात आले आणि त्यालाही जाळून मारण्यात आले.
7. चार्वाक दर्शनात सुखवादी संकल्पनेचा दृष्टीकोन असा आहे की, सुखप्राप्तीसाठी परिश्रमाला पर्याय नाही कारण माणसाला सुख हवेच असते. सुखासाठी माणसाची सतत धडपड सुरू असते. सुख किंवा आनंद म्हणजे लैंगिक स्वैराचार नाही त्यासाठी ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे. सुख म्हणजे केवळ 'खा, प्या, मजा करा' इतकेच नसून ते भौतिक तत्त्वज्ञानच आहे. युरोपीय प्रबोधनांमध्ये प्राचीन काळात या भौतिक तत्त्वज्ञानाने खूपच महत्त्वाची भूमिका पार पडल्याची दिसून येते. त्यामुळेच पाश्चिमात्य देशांची झालेली भरीव प्रगती या भौतिकवादी तत्त्वज्ञानातून झालेली आहे हे नाकारता येत नाही.
माणसाला सुख हवे- हवे असून त्यासाठीच तर ही सर्व धडपड सुरू असते. प्रत्येकाला वाटते की सुखाची झोप यावी, विनाकारण यज्ञयागादिंचे दु:ख होऊ नये. जोपर्यंत जीव आहे तोपर्यंत सुखाने जगावे, आहे प्रसंगी कर्ज काढून तूप विकत घेतले तर ते स्वतः प्यावे. उद्योग - व्यापार करून आर्थिक घडी बसवावी आणि आयुष्यभर तूप पित रहावे. यज्ञअग्निमध्ये तूप जाळून ते वाया घालवू नये. शरीर भस्म झाल्यावर यज्ञामध्ये तूप जाळल्याने आत्म्याला फळ मिळेल हे चार्वाकांना मान्य नव्हते कारण एकदा शरीर भस्म झाले की माणसाला ते पुन्हा परत मिळत नाही.
8. डॉ. आ. ह. साळुंखे यांनीही आपल्या आस्तिक शिरोमणी चार्वाक या ग्रंथात चार्वाकाच्या मुख्य श्लोकावरभाष्य करताना या सिद्धांतात गैर काय आहे? अनैतिक काय आहे? माणसाला जन्म एकदाच मिळतो, त्यामुळे तो सुखासमाधानात घालवा असे म्हटले आहे. चार्वाकांनी कर्ज काढून तूप प्या असे सांगताना घेतलेले कर्ज बुडवा किंवा काढलेल्या कर्जातून अनैतिक बाबी करा किंवा लोकांना लुबाडा किंवा मन मानेल तसा स्वैराचार करा असे म्हटलेले नाही. चार्वाकांची सुखवादी संकल्पना ही अधिक व्यापक स्वरूपाची होती. आयुष्यभर सुखी होण्यासाठीच्या दृष्टीकोनातून त्यांनी सुचवलेले हे नैतिक पर्याय म्हणून आपणास त्याकडे पाहता येईल.
चार्वाक दर्शनातील सुखवादी संकल्पनेबाबतविं. दा. करंदीकरांनी आपला दृष्टीकोन वरील काव्यातून मांडला आहे. त्यांच्या काव्याचा अर्थ असा आहे की, मानवाला काव्य, नृत्य आणि संगीत ह्या कला सुखद अनुभव देतात आणि यासाठी

राजकीय स्थैर्याची गरज खूप महत्त्वाची असते. राजकीय स्थैर्य प्रजेचे जीवन सुखी करण्यासाठी आवश्यक आहे.

9. चार्वाकांनी वैदिक संस्कृतिच्या भ्रामक तत्वज्ञानाला विरोध करून टीका केली आहे. चार्वाकांनी वेदापेक्षा विवेक महत्त्वाचा मानला. स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, पुर्वजन्म-पुनर्जन्म अशा बाबींना थारा दिलानाही तर इहलोकी सुख मिळवण्याचा प्रयत्न करावा असे म्हटले. या अनुषंगाने विं. दा. करंदीकर यांनी 'चार्वाक दर्शन' या कवितेत मात्र चार्वाक दर्शनाचे सत्यरूप पुढील कवितेतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे –

"इहलोकी असे/राजा हा ईश्वर
जीवन सुखकर/करणारा
नागड्या स्वार्थाचा/नसे पुरस्कार
सुखवादी विचार/सांगताना"

चार्वाक दर्शनाचे सत्यरूप असे आहे की, सुखवादी विचार सांगताना इहलोकी राजालाच ईश्वर मानण्याचे कारण म्हणजे राजा स्वार्थी नसतो तर तो प्रजेचे हित पाहणारा - प्रजेचे जीवन सुखी करणारा असतो. चार्वाकांनी वेदातील काही भागाची अर्थ शून्यता दाखवून दिली आहे. यज्ञात टाकलेली आहूती स्वर्गाला जाते तर यजमानाने आपल्या तीर्थरूपांना अशा तऱ्हेने स्वर्गात का पाठवू नये? श्रद्धात दिलेले अन्न परलोकीच्या पितरांना पोहोचते तर प्रवासाला बाहेर पडलेल्या माणसाला शिदोरी कशाला बांधायची? घरीच श्राद्ध का करू नये? असे मिश्किल व वास्तवादी प्रश्न उपस्थित करून वेदातील कर्मकांड हे भ्रामक कल्पनावर उभे आहे हे त्यांनी दाखवून दिले. मरणोत्तर स्वर्ग – नरकाच्या - पारलौकिक जगाच्या कल्पना मांडून आजचे जीवन दु:खी करण्याचा प्रयत्न भिक्षुकाने केला असा घणाघात चार्वाकांनी केला आहे. जीवनात सगळे दु:ख आहे असे समजून सुखाचा त्याग करण्याचा सल्ला मूर्खपणाचाच ठरेल असे चार्वाक स्पष्ट करतात अर्थात असेही म्हणता येईल की–

"चांगले वाईट यांच्यामध्ये भेद - करी सुखवाद चार्वाकाचा"

10. वैदिकाने परलोकी सुखाचा स्वीकार केला व त्यालाच अधिक महत्त्व दिले. परलोकी दुःख टळावे म्हणून इहलोकी दुःख भोगायला लागले तरी चालेल आणि इहलोकी सुख सोडावे लागले तरी चालेल असे त्यांनी मानले. परलोकीच्या सुखाविषयी मोक्ष व स्वर्ग या दोन संकल्पना वैदिकाने स्वीकारल्या, यामध्ये मोक्ष म्हणजे जन्म मरणाच्या फेऱ्यातून मुक्तता आणि स्वर्ग म्हणजे पुण्य असेपर्यंत स्वर्गात सुखाचा उपभोग घेणे होय मात्र चार्वाकांनी सुखाविषयीच्या मोक्ष व स्वर्ग ह्या दोन्ही संकल्पना नाकारल्या तसेच दुःखाविषयीची नरक ही संकल्पना देखील नाकारली. चार्वाकांनी इहलोकी दुःख टाळण्याचा प्रयत्न करावा आणि सुख मिळविण्याचा प्रयत्न करावा असे सांगून इहलोकीचे सुख हाच स्वर्ग आणि इहलोकीचे दुःख हाच नरक असे विचार मांडले. अर्थात सर्व प्राणीमात्रांची मूलभूत प्रेरणा असते ती म्हणजे सुख उपभोगावे आणि दुःख भोगावे लागू नये.
11. सर्वदर्शनसंग्रहांमध्ये चार्वाकांचे सुखाविषयीचे विचार विस्ताराने मांडण्यात आले आहेत. सुखाबरोबर येणारे दुःख अलगद दूर करून केवळ सुखाचा आस्वाद घेणे इष्ट होय. यासाठी काही उदाहरणे देण्यात आली आहेत ती अशी की, मासे खाताना काटा बाजूला काढून खावा, साळीचे टरफल काढून त्यातून तांदूळ प्राप्त करावे व भात करून खावा. जर एखादा भित्रा माणूस अनुभवगम्य सुखाचा त्याग करत असेल तर ते मूर्खपणाचे ठरेल. स्त्रीच्या अलिंगनापासून मिळणारे सुख हाच स्वर्ग आणि काटा बोचल्याने होणारे दुःख हाच नरक असे चार्वाक म्हणतात. वैदिक पारलौकिक सुखाचा गौरव तर करायचे मात्र ऐहिक सुखासाठी तडफडायचे हा झाला ढोंगीपणा मात्र त्यापेक्षा चार्वाकांची वृत्ती सरळ व प्रामाणिक आहे. वैदिकांनी चार्वाकांच्या सुखवादी विचाराचा काढलेला संकुचित अर्थ होय.

**चार्वाक दर्शनातील नाविन्यता आणि सद्य: स्थिती यांचा अभ्यास**

चार्वाक दर्शनातील नाविन्यता आणि सद्य: स्थिती यांचा अभ्यास पुढीलप्रमाणे करण्यात आला आहे -

1. दुःखाला भिऊन पडण्यात कसला आला आहे पुरुषार्थ त्यापेक्षा दुःखावर कशी मात करता येईल ते पहावे असे चार्वाक सांगतात. इहलोकात दुःख निश्चित आहे मात्र त्यामुळे संसाराचा द्वेष करणे उचित नाही. इहलोकी दुःखाची तीव्रता कौशल्याने कमी करून सुखाचा आनंद कसा घेता येईल हे शहाणपणाचे आहे. चार्वाकांनी दुसऱ्याला लुबाडून किंवा फसवून सुख मिळवायचे सांगितले नाही तर कष्ट करून सुखाचा उपयोग घ्यावा तसेच सुखाचा उपभोग घेताना चार्वाकांनी स्वैराचाराचे समर्थन व पुरस्कार केलेला नाही उलट संयम ठेवण्याचे सांगितले आहे. सुखाबाबत चार्वाक म्हणतात की, "माणसाने ते कर्म करावीत की ज्यामुळे अखेरीस सुख प्राप्ती होईल."
चार्वाकांची भविष्यकाळ मृत्यूच्या पलीकडे ताणावा अशी त्यांची इच्छा नव्हती तर वर्तमान काळातील कृतींच्या भविष्यकालीन परिणामाची त्यांना जाणीव होती म्हणून चार्वाकांनी भावी सुखासाठी विवेक पूर्ण कृती करावी असे म्हटले आहे. चार्वाक दर्शन हे भौतिकवादी जरी असले तरी त्यातील वस्तुनिष्ठता विवेकावर आधारित अशी आहे. विनाकारण आजचे हाताशी आलेले सुख घालवून पारलोकिक सुखाच्या मागे लागण्यात कसला आला आहे शहाणपणा अशी चार्वाकांची धारणा होती. मानवाने जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत ते सुखासमाधानाने व्यतीत करावे जर का मृत्यू झाला तर पुन्हा शरीर परत येत नाही.
2. चार्वाकांनी मांडलेल्या विचारात एक प्रकारची सुसंगती होती. त्यांनी देहवाद स्वीकारला असल्यामुळे पुर्वजन्म -पुनर्जन्म, पाप – पुण्य, कर्म सिद्धांत, परलोक, मोक्ष, स्वर्ग – नरक या बाबी नाकारल्या. चार्वाकांनी प्रमाण विचार स्वीकारला असल्यामुळे त्यांनी साहजिकच ईश्वर ही नाकारला. शरीर आणि आत्मा भिन्न मानले तरच पारलौकिक जगाचा डोलारा उभा करता येतो मात्र चार्वाकांना शरीर आणि आत्मा हा एकच मानल्यामुळे त्यांच्या विचारात पारलौकिक जगाला स्थान नाही तर ती भ्रामक कल्पना आहे. त्यामुळे लौकिक जगतातील जीवन असह्य होते ते पटवून दिले. चार्वाक दर्शनातील अपुरी माहिती (कारण चार्वाकाचे ग्रंथ जाळले गेले होते) विरोधकांनी लावलेले त्यांच्या दर्शनाबद्दलचे विरोधाभासी अर्थ आणि त्यांच्याबद्दलची विरोधी वलये यामुळे चार्वाकांना केवळ सुखवादी ठरविण्यात आले. माणसाची जगण्याची इच्छा ही नैसर्गिक असते. आपल्या सर्वांना कंटाळवाणे आयुष्य नको असते तर सर्वांनाच जीवनात रस हवा असतो. जीवनातील प्रतिकूल बाबींना अनुकूल बनविण्याचे कौशल्य प्राप्त करून मानवाला जीवनात सुख आणता आले पाहिजे यावर चार्वाक विचाराचा भर होता.

पतंजली योगसूत्रातही सुखाबाबत करण्यात आलेले विवेचन पुढीलप्रमाणे आहे –
"अनुकूल वेदना सुखम्, प्रतिकूल वेदना दुखम्"

पतंजली योगसूत्रात सुखासाठी वेदना सांगण्यात आल्या आहेत मात्र येथे वेदना ह्या अनुकूल असाव्या लागतात तर दु:खासाठीच्या वेदना ह्या प्रतिकूल असाव्या लागतात. सामान्यतः आपण इच्छा पूर्ण होण्याला सुख किंवा आनंद मानतो.

3. सामान्यपणे अतीतवादी, आत्मवादी असणाऱ्या भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेत आपल्या जडवादी, अनुभववादी आणि

सुखवादी तात्विक भूमिकेमुळे चार्वाक तत्वज्ञानाचे वेगळेपणाने उठून दिसते.चार्वाक ईश्वराचे अस्तित्व नाकारत होते म्हणजे अगदी वैदिकांच्या दृष्टीने देखील काही तर फार मोठा गुन्हा करीत होते. चार्वाक वैदिकांच्या ओंजळीने पाणी प्यायला तयार नव्हते, हा त्यांचा खरा गुन्हा होता. वेदप्रामाण्य नाकारणेही नास्तिकता म्हटली जात होती मात्र हा निकष म्हणजे वरवरचा होता कारण वैदिकांची धारणा अशी होती की, तुम्ही ईश्वर मानता की नाही मानत याला फारसे महत्त्व नसून तुम्ही आमचे ऐकत आहे की नाही? हा खरा दृष्टिकोन होता यालाच वेदप्रामाण्य म्हणत असत. चार्वाकांना नास्तिक म्हणताना वैज्ञानिक दृष्टिकोनातून आणि पूर्णपणे पारिभाषिक संज्ञा या स्वरूपात अर्थ घेतलेला नाही. ईश्वर, वेदप्रामाण्य इत्यादी संकल्पना नाकारतो म्हणजे चार्वाक नास्तिक आहे परंतु नेमक्या तेवढ्याच अर्थाने ते नास्तिक आहेत असे वैदिकाने संबोधले नाही.

ईश्वराचे अस्तित्त्व मानणे किंवा न मानणे हा प्रमुख मुद्दा चार्वाक आणि वैदिकांच्या मध्ये नव्हता कारण तुम्ही ईश्वर मानता की नाही हे महत्त्वाचे नसून तुम्ही आमचे ऐकता की नाही हे महत्त्वाचे आहे हा वैदिकांचा दृष्टीकोन दिसून येतो यावरून चार्वाकाला वैदिकांनी नास्तिक ठरविले. मग चार्वाकांचे वैदिक ऐकत नसतील तर चार्वाक आस्तिक आणि वैदिक नास्तिक असे म्हणणे अयोग्य होणार नाही. चार्वाक दर्शनातील तत्त्वविचारांचे विश्लेषण केले तर कर्मकांडात भरकटत चाललेला आणि अतिभौतिकतेच्या फेऱ्यात अडकलेला मानव वर्गाला निश्चितच दिशा मिळेल.

4. आधुनिकता ही काळावर नाही तर ती विचार सूत्रावर निश्चित होत असते त्यामुळे वैदिकांनी निर्माण केलेल्या सर्वच बाबींची चिकित्सा करणे आधुनिकतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. वैदिकांच्या विचारशैलीत नकारात्मकतेचा सुरू वारंवार दिसून येतो. वैदिकांनी विषमता, अन्याय, वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, लिंगभेद आणि पारलौकिक जगाबद्दल भ्रामक कल्पना, पुर्वजन्म-पुर्नजन्म, काल्पनिकता अशा विविध बाबीतून गुलामगिरीची व्यवस्था विकसित केलेली आहे. या व्यवस्थेला सकारात्मक शैलीतउत्तर देऊन चार्वाक तत्त्वविचाराने मानवतावादी व्यवस्थेचे समर्थनच केले नाही तर तशा प्रकारची समाज व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न या विचारधारेने केला आहे.

   सर्व विचारांचा केंद्रबिंदू माणूस आहे त्यामुळे माणसाला सुखी जीवन कसे जगता येईल? याचा विचार प्रखरतेने करण्यात आला आहे. चार्वाक तत्त्वविचारात भ्रामक कल्पनांना थारा दिला नाही तर हे विचार इहलोकांना प्राधान्य देत माणसाने वास्तववादस्विकारला पाहिजे असा आग्रह धरला जातो.पारलौकिक जीवनाच्या आणि पूनर्जन्माच्या स्वप्नामध्ये गुंतलेला माणूस ऐहिक जीवनाकडे आणि वर्तमान कर्तव्याकडे पाठ फिरवतो याला कारण कर्मकांड! कर्मकांडात व्यक्ती आणि समाजाला गुंतवून ठेवण्यात वैदिक वृत्तीने तत्परता दाखवली होती, याला प्रखर विरोध चार्वाक तत्त्वविचारांनी केला आहे. चार्वाक दर्शनात माणसाच्या भौतिक जीवनात प्राधान्य दिले ज्यामुळे सद्यः स्थितीत मानवी विकासाची अनेक दालने समृद्ध होण्यास मदत होण्यासाठी आणि भौतिक जीवनाचा खरा आनंद घेण्याची सक्षम क्षमता असलेल्या मानवाला त्याच्या क्षमताची जाणीव करून देण्याचे कार्य चार्वाकतत्त्वविचारांनी केलेले आहे.

5. प्राचीन भारतातील ही इहलोकवाद 'लोकायत' या नावानेच प्रामुख्याने ओळखला जातो.चार्वाकांनी आत्मा,मौक्ष, स्वर्ग-नरक, परलोक, पुर्वजन्म-पुर्नजन्म इत्यादी कल्पना असिद्ध ठरवून हे इहलोकवादाने तार्किक समर्थन केल्याने या विचाराला 'चार्वाक दर्शन' हे नाव प्राप्त झाले. चार्वाक दर्शन हे देव, दैव अध्यात्म इत्यादी संदर्भात नास्तिक दर्शन वाटले तरी ते शेती, व्यापार, उद्योग करून धन कमवून सुखाने जगावे असे सांगते. हे लक्षात घेता चार्वाक दर्शन हे अस्तिकवादी म्हणजे जीवना संदर्भातील सकारात्मक दर्शन ठरते. प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांनी चार्वाकास 'आस्तिकशिरोमणी' संबोधले आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. चार्वाकांनी मोक्षास पुरुषार्थ न मानता अर्थ आणि काम तत्त्वास पुरुषार्थ स्वरूपात स्वीकारला, जीवनाविषयी आस्था व्यक्त केली. परलोकवादी विचारसरणीचा सर्वात कृत प्रतिवाद म्हणजे समाजास अंधश्रद्धेपासून दूर ठेवण्यासाठी सामाजिक कर्तव्य परायणता नाही का? वर्णभेद नि जातीभेद विरोध, स्त्री अत्याचाराचा वाचा फोडणे इत्यादीतून चार्वाकांची समशीलता स्पष्ट होते. चार्वाकाचे तत्त्वज्ञान सुसंघटित समाजाचे स्वप्न पाहते, ते सहिष्णू समाज निर्माण करू इच्छिते यातून ते दर्शन आस्तिक आणि आदर्शवादी ठरते. आज आधुनिक समाजात निव्वळ दोन गट दिसतात एक म्हणजे अति अंधश्रधाळू आणि दुसरा म्हणजे अति भौतिकवादी यातील सुवर्णमध्य साधणे हे सद्यःस्थितीत चार्वाक दर्शनाने शक्य आहे.

## संदर्भसूची:


1. आठवले सदाशिव, 'चार्वाक: इतिहास आणि तत्त्वज्ञान', वाई, प्राज्ञ पाठशाळा
2. कुमठेकर, उदय 'चार्वाकमंथन', पुणे, परामर्श प्रकाशन
3. साळुंके, आ. ह. 'आस्तिकशिरोमणी चार्वाक', सातारा, लोकायत प्रकाशन
4. गाडगीळ,स. रा., लोकायत, मुंबई, लोकवाङ्मय गृह १९७४
5. कुमठेकर, उदय, वेध चार्वाकाचा,नांदेड, अभय प्रकाशन
6. दिक्षित, श्रीनिवास, भारतीय तत्त्वज्ञान, कोल्हापूर, फडके प्रकाशन
7. गोखले, प्रदीप, तत्त्वचिंतक चार्वाक, पुणे, मनोविकास प्रकाशन २०१३
8. चार्वाक (२०१३, एप्रिल ६ (विकिपीडिया) एक मुक्त ज्ञान कोष Retrieved मार्च ११, २०१४
9. डॉ, नागोराव कुंभार, 'विचारशलाखा'जोड अंक १४६-१४९, वर्ष ३८ वे मार्च एप्रिल २०२३
10. https://iep.utm.edu/indmat/
11. https://www.evivek.com/Encyc/2021/3/22/charvaka-philosophy-in-marathi.html
12. http://mr.wikipedia.org/w/index.php?title=%E0%A4%9A%E0%A4%BE%E0%A4%B0%E0
13. https://mr.wikipedia.org/s/80
14. मराठी विकिपीडियातील लेख आणि त्यात नमूद संदर्भ